महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM


✻ उत्सुकता ✻





RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – २९० ■ गुरूवार, दि. ११ जून २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४


# कळवण - रुग्णालयाच्या भोंगळ कारभाराविषयी अर्धनग्न आंदोलन

# जिल्हा शल्यचिकित्सक डॉ शिंपी यांच्या लेखी आश्वासनांतर आंदोलन मागे

## वरिष्ठ कार्यालयाची परवानगी न घेता गैरहजर राहणाऱ्या अधिक्षाकांना कारणे दाखवा नोटीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक बागुल, कळवण प्रतिनिधी – कळवण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तसेच वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने विसा-पूर येथील एका नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. त्याविरोधात कळवण येथील सर्वपक्षीय पदाधिकारी व मयत बालकाच्या नातेवाईकांनी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर तब्ब्ल पाच तास अर्धनग्न होत ठिय्या आंदोलन केले..रुग्णालयाचे अधीक्षक डॉ प्रशांत पाटील गैरहजर असल्याने आंदोलनाची दखल घेत जिल्हाशल्य चिकित्सक डॉ सतीश शिंपी यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत कळवण गाठत त्यांच्या मागण्या एकूण घेतलय तसेच अधीक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावत सदर घटनेस जवाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, कळवण तालुक्यातील विसापूर येथील दीप-ाली केवळ माळी यांना प्रसूतीसाठी दि. ६ जून रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास कळवण उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्यांनी एका बाळाला जन्म दिला. दि. ९ जून रोजी दुपारच्या सुमारास आईने बाळाला दूध पाजल्यानंतर काही वेळाने बाळाला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. यावेळी रुग्णालयात उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी धातूर मातुर उपचार केल्याचा आरोप रुग्णाच्या नातेवाईकांनी केला आहे. यावेळी बाळाची प्रकृती अधिक गंभीर होत असल्याचे लक्षात आल्यानंतर दुपारी २ वाजेच्या सुमारास बाळाला पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. रुग्णाच्या आदिवासी गरीब घटकातील तसेच बाळाची आई व वडील दोघेही मूकबधिर असल्याने इतर नातेवाईकांच्या डॉक्टरांनाच रुग्णवाहिका बोलविण्यास सांगितले दुपारी २.३० वाजेच्या सुमारास रुग्णवाहिका कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. मात्र, अनेक तास उलटूनही रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. परिणामी उपचारासाठी वेळेत हलविणे शक्य न झाल्याने रात्री ९ वाजेच्या सुमारास नवजात बालकाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनावर हलगर्जी केला असल्याचा गंभीर आरोप करत संबंधित डॉक्टर व रुग्णवाहिका सेवेशी संबंधित कर्मचाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करून न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

या घटनेची वार्ता आज शहरात पसरताच सर्वपक्षीय पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते व नातेवाईक यांनी कळवण उपजिल्हा रुग्णालयाचा भोंगळ कारभार उघडकीस आणण्यासाठी अर्धनग्न होत रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करून जिल्हा जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाची दखल घेत कळवण उपजिल्हा रुग्णालयास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सतीश शिंपी, आरएमओ डॉ संदीप सूर्यवंशी नोडल अधिकारी डॉ अनंत पवार, भूलतज्ञ् अनंत गायकवाड, समन्वयक महात्माफुले आरोग्य योजना डॉ बाबासाहेब देशमुख आदी उपस्थित राहुन आंदोलकांचे मागण्या व म्हणणे एकूण घेतले. आंदोलकांनी जिल्हा शल्य चिकित्सक शिंपी यांचे समोर तक्रारींचा पाढाच वाचला. या आंदोलनाची दखल घेत. रुग्णालयात मोठी दुर्दैवी घटना घडली असताना आपण वरिष्ठ कार्यालयाची परवानगी न घेता गैरहजर राहिल्या बद्दल अधीक्षक डॉ प्रशांत रामदास पाटील याना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच त्या दिवशी या घटनेस इतर जे कर्मचारी जवाबदार असतील त्यांची चौकशी करून त्यांचेवर जवाबदारी निश्चित करून कारवाईचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या अंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख शरद पगार, कांदा उत्पादक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विलास रौंदळ, सामाजिक कार्यकर्ते टिनू पगार,भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष महेश काकूळते, कळवण खुर्दचे उपसरपंच संदीप शिंदे, शशी हिरे, शिवसेना माजी ग्रामीण जिल्हाप्रमुख कारभारी आहेर,काशिनाथ गुंजाळ,चेतन पगार,सुरज पगार,सचिन शिरसाठ, सह प्रसुत महिलेचे नातेवाईक सहभागी झाले होते.

रुग्णालयातील त्रुटींबाबत वेळोवेळी रुग्णालय अधीक्षकांना सांगूनही बदल होत नसल्याने आज आंदोलनाचे हत्यार उपसावे लागले. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जी पणामुळे एका निष्पाप गरीब आदिवासी बालकाला जीव गमवावा लागला आहे. हलगर्जी करणाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे जेणे करून भविष्यात पुन्हा निष्पाप रुग्णाला जीव गमवावा लागणार नाही.
– शरद पगार, शिवसेना तालुका प्रमुख

दोन दिवसांनी हे होणार बदल – दोन श्त्री रोग तज्ञ मिळणार, डॉ प्रल्हाद चव्हाण प्रतिनियुक्तवर येणार, आठवड्यातून दोन दिवस सोनोग्राफी डॉ उपलब्ध होणार, अस्तिरोग तज्ञ उपलब्ध करून देणार, पिण्याचे पाणी उपलब्ध करणार, औषध साठा देणार, रुग्ण तपासणीच्या वेळेत बदल करून सकाळी ८ ते दुपारी २ वाजता सुरु ठेवणार, जन्म दाखला बाळाच्या आईसोबतच देणार, विवाह नोंदणी दाखला वेळेत देणार, स्वच्छता वेळेत होणार, सिटीस्क्यान व एक्सरे मोफत सुरु राहणार आदी .
– जिल्हाशल्य चिकित्सक डॉ सतीश शिंपी

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 'युझर चार्जेस' निर्णयाला स्थगिती

## बाजार समित्यांच्या प्रश्नांवर राज्यस्तरीय समित्या गठित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कराड –

पुणे: पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने लागू केलेल्या 'युझर चार्जेस'च्या निर्णयाला राज्य सरकारने तात्पुरती स्थगिती दिली आहे. दि पूना मर्चंट्स चेंबर आणि महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने या शुल्कवाढीला विरोध दर्शवल्यानंतर पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत व्यापारी संघटना आणि बाजार समितीच्या प्रतिनिधींची बाजू ऐकून घेतल्यानंतर मंत्र्यांनी पुणे बाजार समितीच्या युझर चार्जेसच्या निर्णयावर स्थगिती देण्याचे निर्देश दिले. तसेच या विषयावर तोडगा काढण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समिति ने १५ दिवस-ात निर्णय घ्यावा असे सूचविले पुणे साठी च्या समितीत पणन संचालक, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती



आणि सचिव यांच्यासह दि पूना मर्चंट्स चेंबरचे चार प्रतिनिधी असतील. समिती पुढील १५ दिवसांत बैठक घेऊन आपला अहवाल आणि शिफारसी सरकारकडे सादर करणार आहे.

बैठकीत राज्यातील इतर बाजार समित्यांशी संबंधित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रलंबित विषयांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीत पणन संचालक, मुंबई बाजार समितीचे सहसचिव आणि सहा व्यापारी प्रतिनिधींचा समावेश असेल.

मुंबई आणि पुणे वगळता राज्यातील इतर बाजार समित्यांच्या प्रश्नांसाठी आणखी एक विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत पणन संचालकांसह महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांनी सुचविलेले सात सदस्य व बाज़ार समिति विषयतील तज्ञ सदस्य असतील.

बैठकीला पणन संचालक शरद ज़रे पुणे बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, सचिव राजाराम धोंडकर, व्यापारी कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया, दी पूना मर्चेंट्स चेम्बर चे उपाध्यक्ष अजित बोरा, माज़ी अध्यक्ष रायकुमार Zh-maC-MIT चे अध्यक्ष मोहन गुरनानी, चेयरमेन दीपेन अग्रवाल, GROMA चे अध्यक्ष भीमजी भानुशाली, उपाध्यक्ष अमृत जैन ऋ-च् चे अध्यक्ष जितेंद्र शहा यांच्यासह व्यापारी प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

युझर चार्जेसच्या निर्णयाला स्थगिती मिळाल्याने व्यापाऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असून, समितीच्या अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे

## सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे वेळेत पूर्ण करावीत – अपर मुख्य सचिव म्हैसकर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक–: नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजित कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळेत पूर्ण करावीत. त्यासाठी महसूल विभागाने भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दिले. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर 'भूसंपादन सद्य स्थिती व अपेक्षित मार्गदर्शन' याविषयावर जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज सकाळी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अपर मुख्य सचिव श्री. म्हैसकर अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, राकेश सेपट, ब्रिजेश दीक्षित, देवेंद्र पवार, अर्पिता ठुबे (नाशिक), डॉ. पवन दत्ता (इगतपुरी), नवनाथ सोनवणे उपस्थित होते.






**दै. आवाज वृत्तसेवा...**

वाखारी येथील महिलांचा पंचायत समिती प्रशासनाकडे मोर्चा...

पंधरा दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास दिला उपोषणाचा इशारा



# नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना भरीव मदत द्या; महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेची मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने राज्य शासनाकडे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी विशेष आणि न्याय्य प्रोत्साहनपर योजना जाहीर करण्याची मागणी केली आहे.राज्यातील लाखो शेतकरी वर्षानुवर्षे आर्थिक अडचणींना सामोरे जात असतानाही पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करीत आहेत.अशा शेतकऱ्यांनी आर्थिक शिस्त,प्रामाणिकपणा आणि जबाबदारीचे पालन करून बँकिंग व्यवस्थेवर विश्वास कायम ठेवला आहे.मात्र,अशा शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करणारी ठोस योजना शासनाकडून अद्याप दिसून आलेली नाही.महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेची मागणी आहे . की,नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र प्रोत्साहनपर योजना जाहीर करून त्यांना किमान २ लाख ५० हजारांचे विशेष अनुदान



देण्यात यावे. याशिवाय व्याज सवलत, वाढीव पीक कर्ज मर्यादा, विमा प्रीमियममध्ये सवलत आणि इतर प्रोत्साहनपर लाभ देण्याचाही शासनाने विचार करावा.आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देणे हे कोणत्याही सक्षम अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य असते.त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान राखण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी महाराष्ट्र राज्य उत्पादक संघटनेने तसेच सोशल मीडिया प्रमुख बाळकृष्ण सांगळे यांनी केली आहे.

# शुद्ध गुळाच्या चवीने जिंकली ग्राहकांची मने; आता 'कालांश'ची राज्यव्यापी भरारी!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोपरगाव प्रतिनिधी

आरोग्यदायी आणि पौष्टिक खाद्यपदार्थांची वाढती मागणी लक्षात घेऊन 'कालांश महिला गृहउद्योग / बचत गट'ने आपल्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांच्या बळावर बाजारपेठेत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. शुद्ध गुळापासून तयार करण्यात येणारे 'कालांश राजगिरा लाडू' आणि 'राजगिरा चिक्की' हे पदार्थ ग्राहकांच्या पसंतीस उतरले असून आता या ब्रँडने महाराष्ट्रभर डीलरशिप आणि डिस्ट्रीब्युटरशिपच्या माध्यमातून व्यवसाय विस्ताराचे मोठे पाऊल उचलले आहे.
स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि नवउद्योजकांना व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'कालांश' ब्रँडने राज्यभरात वितरकांचे मजबूत जाळे उभारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे किराणा दुकानदार, सुपरमार्केट, मॉल तसेच स्वतंत्र वितरण व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांसाठी ही एक मोठी संधी मानली जात आहे.

व्यापाऱ्यांसाठी फायदेशीर योजना

बाजारात राजगिरा लाडू आणि चिक्कीची मागणी मोठ्या प्रमाणावर असली तरी अनेक व्यापाऱ्यांना अपेक्षित नफा मिळत नसल्याची समस्या कायम असते. याच पार्श्वभूमीवर 'कालांश'ने व्यापाऱ्यांसाठी आकर्षक योजना जाहीर केली आहे.

'कालांश'सोबत जोडल्यास मिळणारे प्रमुख फायदे

व्यापाऱ्यांना १५ ते २० टक्क्यांपर्यंत आकर्षक आणि खात्रीशीर मार्जिन.
बाजारातील इतर ब्रँड्सच्या तुलनेत स्पर्धात्मक दर.
एक्सपायरी मालावर १०० टक्के रिप्लेसमेंट गॅरंटी, त्यामुळे नुकसानाची चिंता नाही.
अतिरिक्त मालाचा दबाव किंवा डंपिंगची सक्ती नाही.
दरमहा जाहिरात आणि मार्केटिंगसाठी कंपनीकडून संपूर्ण सहकार्य.
ग्राहकांना आवडणारी चव, आकर्षक व स्वच्छ पॅकेजिंग आणि विश्वासार्ह गुणवत्ता.

गुणवत्ता आणि विश्वासाची परंपरा

'कालांश' उत्पादनांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शुद्ध गुळाचा वापर, उत्कृष्ट गुणवत्ता आणि आरोग्यदायी गुणधर्म. त्यामुळे ग्राहकांकडून या उत्पादनांना सातत्याने वाढता प्रतिसाद मिळत असून बाजारपेठेत त्यांची मागणीही वाढत आहे.

व्यवसाय विस्तारासाठी आवाहन

जर आपण किराणा दुकान, सुपरमार्केट किंवा मॉल चालवत असाल अथवा आपल्या परिसरात स्वतंत्र डिस्ट्रीब्युशन नेटवर्क उभारून नफ्याचा व्यवसाय सुरू करू इच्छित असाल, तर 'कालांश महिला गृहउद्योग व बचत गट'सोबत जोडण्याची ही योग्य वेळ आहे.
जास्त गुणवत्ता, जास्त विश्वास आणि जास्त नफा हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असलेल्या 'कालांश'कडून किराणा व्यावसायिक, सुपरमार्केट आणि वितरकांसाठी मर्यादित जागा उपलब्ध असून इच्छुकांनी त्वरित आपले क्षेत्र निश्चित करून या व्यवसाय संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते एम.ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे ॲडव्हान्स्ड प्री-क्लिनिकल सिम्युलेशन लॅबोरेटरीचे उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, १० जून २०२६ : पुणे: आरोग्यसेवा अधिकाधिक माहितीआधारित आणि तंत्रज्ञानावर आधारित होत असताना, वरिष्ठ दंतवैद्यकीय शिक्षकांचे मत आहे की भविष्यातील विशेषज्ञांसाठी सर्वात महत्त्वाचे कौशल्य केवळ कठीण उपचार करणे नसून, उपचार सुरू होण्यापूर्वी योग्य निर्णय घेणे हे असू शकते.

महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे ॲडव्हान्स्ड प्री-क्लिनिकल सिम्युलेशन लॅबोरेटरीचे नुकतेच उद्घाटन पुण्यात झाले. या कार्यक्रमात हा मुद्दा विशेष चर्चेत आला. कार्यक्रमात मंत्री मुश्रीफ यांनी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, जनजागृती आणि बदलत्या रुग्ण गरजांना व वेगाने बदलणाऱ्या आरोग्य क्षेत्राला प्रतिसाद देऊ शकणारे भविष्यातील आरोग्य व्यावसायिक तयार करण्याची गरज यावर भर दिला.



हसन मुश्रीफ पुढे म्हणाले की, अनेक दशकांपासून विशेषज्ञ प्रशिक्षण म्हणजे प्रामुख्याने उपचार करण्याचे तांत्रिक कौशल्य असे मानले जात होते. ही कौशल्ये आजही महत्त्वाची आहेत. मात्र आजचे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये अधिक चांगली निदान क्षमता, विचारपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता आणि पुराव्यावर आधारित उपचार नियोजन विकसित करण्यावर अधिक भर देत आहेत. याचे कारण सोपे आहे. आरोग्य क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना पूर्वीपेक्षा जास्त माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे त्या माहितीचा योग्य अर्थ लावणे हेच एक महत्त्वाचे व्यावसायिक कौशल्य बनत आहे.

डॉ. विवेक हेगडे, उपप्राचार्य तसेच कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री आणि एंडोडॉन्टिक्स विभागाचे प्राध्यापक व प्रमुख, यांच्या मते भविष्यातील विशेषज्ञांनी वैद्यकीय कौशल्यासोबत निदान आणि उपचार नियोजनाचे सखोल ज्ञानही आत्मसात करणे गरजेचे आहे. भविष्यातील विशेषज्ञांची ओळख अधिकाधिक अचूक निदान आणि योग्य वैद्यकीय निर्णयक्षमतेवरून ठरेल. सीबीसीटीसारख्या तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू करण्यापूर्वीच शरीररचना, आजार आणि उपचार नियोजन याबद्दल अधिक सखोल समज विकसित करता येते, असे त्यांनी सांगितले. विशेषज्ञ शाखांमध्ये निदानाचे महत्त्व अधिक स्पष्टपणे दिसते. कारण अनेक उपचारांचे परिणाम हे उपचार सुरू होण्यापूर्वी केलेल्या नियोजनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतात.

शस्त्रक्रिया, इम्प्लांटोलॉजी आणि पदव्युत्तर शिक्षण क्षेत्रात दीर्घ अनुभव असलेले वरिष्ठ ओरल अँड मॅक्सिलोफेशियल सर्जन डॉ. जनार्दन गार्डे यांच्या मते आधुनिक आरोग्यसेवेतील सर्वात मोठ्या बदलांपैकी एक म्हणजे नियोजन आणि अचूकतेवर वाढता भर.आधुनिक विशेषज्ञ उपचारपद्धतीत उपचाराची गुणवत्ता अनेकदा प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच ठरते. अचूक निदान आणि विचारपूर्वक नियोजन हे यशस्वी परिणामांचे मुख्य आधार बनत आहेत, असे त्यांनी सांगितले.

या बदलांचा परिणाम पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावरही होत आहे. आरोग्य शिक्षणात सिम्युलेशन-आधारित शिक्षण, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान आणि डिजिटल पद्धती अधिक प्रमाणात वापरल्या जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आजच्या प्रत्यक्ष वैद्यकीय कामकाजासारखे प्रशिक्षण वातावरण देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

रंगूनवाला येथे अलीकडेच सुरू करण्यात आलेली सीबीसीटी सुविधा, या मोठ्या बदलाचे उदाहरण आहे. नव्याने सुरू झालेली सिम्युलेशन लॅबोरेटरी आणि आगामी डिजिटल डेंटिस्ट्री उपक्रम यांच्यासोबत ही सुविधा तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणाकडे होत असलेला बदल दाखवते. असा बदल जगभरातील आघाडीच्या आरोग्य संस्थांमध्ये दिसून येत आहे.

दंतवैद्यकीय संशोधन, पदव्युत्तर मार्गदर्शन आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रोस्थोडॉन्टिक व इम्प्लांटोलॉजी संस्थांमधील नेतृत्वासाठी ओळखले जाणारे डॉ. मोहित खेवूर यांच्या मते, तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक विचार यांचा समतोल पुढील काळात अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. प्रगत तंत्रज्ञान तेव्हाच उपयुक्त ठरते, जेव्हा त्यासोबत विचारपूर्वक विश्लेषण आणि पुराव्यावर आधारित निर्णयक्षमता असते. विद्यार्थ्यांनी माहितीचे मूल्यमापन करणे, पुराव्यांचा अर्थ लावणे आणि ज्ञानाचा रुग्णसेवेत जबाबदारीने वापर करणे शिकले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

उद्घाटनावेळी बोलताना मंत्री मुश्रीफ यांनी भविष्यातील आरोग्य आव्हानांना सामोरे जाणारे आरोग्य व्यावसायिक तयार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षकांच्या मते हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मजबूत मार्गदर्शन, प्रगत तंत्रज्ञान आणि संशोधनावर आधारित शिक्षण वातावरण यांचा एकत्रित वापर आवश्यक आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी मुखाईवनमध्ये ३०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरूर : पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनासाठी मुखाईवन येथे ३०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. वनराई संस्था, इनव्हेंलिअर कंपनी आणि मुखाई ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध देशी प्रजातींच्या वृक्षांसह फळझाडांची लागवड करण्यात आली.

मुखाईवन प्रकल्पांतर्गत यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले असून, या मोहिमेनंतर परिसरातील एकूण वृक्षसंख्या २,५०० हून अधिक झाली आहे. लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन, संरक्षण आणि देखभाल नियोजनबद्ध पद्धतीने केली जात असल्याने परिसरातील हिरवाईत लक्षणीय वाढ झाली आहे.

या उपक्रमामुळे स्थानिक जैवविविधतेला चालना मिळत असून विविध पक्षी, फुलपाखरे, कीटक आणि इतर वन्यजीवांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण होत आहे. वाढते तापमान नियंत्रित ठेवणे, मृदा संवर्धन, भूजल पातळी सुधारणे आणि हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमास इनव्हेंलिअर कंपनीचे बिझनेस डायरेक्टर निलेश कुकल्येकर, ऑपरेशन्स व सप्लाय चेन डायरेक्टर उदय शेट्टी, मानव संसाधन व्यवसाय भागीदार सुस्मिता मिश्रा तसेच मानव संसाधन व्यवस्थापक नितीन पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती. कंपनीच्या सुमारे ३० कुटुंबांनीही या वृक्षारोपण मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वनराई संस्थेचे प्रकल्प प्रमुख राकेश शेलार, पर्यावरण तज्ज्ञ मयूर भागवत आणि ऑन-साइट कर्मचारी दिलीप मोरे यांचा इनव्हेंलिअर कंपनीतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी वनराई संस्थेचे सचिव अमित वाडेकर, टीम वनराईचे सदस्य, मुखाई ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण तज्ज्ञ सायली पलांडे यांनी पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि शाश्वत विकासामध्ये वृक्षांचे महत्त्व विशद केले.

पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्वही या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

ग्रामपंचायत, सामाजिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणारा मुखाईवन प्रकल्प हा पर्यावरण संवर्धनाचे आदर्श उदाहरण ठरत असून हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# अर्धा निसर्ग, अर्धे प्रदूषण : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सचिन भोसले यांचा पर्यावरणावरील जिवंत इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुणे : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुणे पँथर सेनेचे अध्यक्ष सचिन भोसले यांनी पुण्यात वाढते प्रदूषण, नदी प्रदूषण, उघड्यावर कचरा जाळणे, कमी होत चाललेली हरितक्षेत्रे आणि पर्यावरणीय असमतोल या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी एक अनोखी जनजागृती मोहीम राबवली.

सामान्य भाषण किंवा प्रतीकात्मक वृक्षारोपण कार्यक्रमाऐवजी सचिन भोसले यांनी विशेष पर्यावरणीय वेशभूषा परिधान केली होती. एका बाजूला निसर्ग, हिरवळ, नद्या, पक्षी आणि स्वच्छ हवा तर दुसऱ्या बाजूला औद्योगिक धूर, प्लास्टिक कचरा, प्रदूषित नद्या, प्लास्टिक बाटल्यांची झाकणे, दुधाच्या रिकाम्या पिशव्या, प्लास्टिक स्ट्रॉ, ॲल्युमिनियम फॉइल, कार्डबोर्ड कचरा, वाळलेली पाने आणि पर्यावरणीय विनाशाचे चित्रण करण्यात आले होते.

या उपक्रमामुळे नागरिकांचे तात्काळ लक्ष वेधले गेले आणि पुण्यासमोरील वाढत्या पर्यावरणीय संकटाचे वास्तव अधोरेखित झाले.



हा फक्त पोशाख नाही – आपण निर्माण करत असलेल्या भविष्याचा इशारा आहे

सचिन भोसले म्हणाले: एका बाजूला आपण वारसा म्हणून मिळालेला निसर्ग आहे, तर दुसऱ्या बाजूला निष्काळजीपणा, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि अनियंत्रित शहरीकरणामुळे होत असलेला विनाश आहे. जर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर पुढील पिढ्यांना स्वच्छ पर्यावरणाऐवजी विषारी हवा, प्रदूषित नद्या आणि नष्ट होत चाललेली झाडे वारसा म्हणून मिळतील.

प्रदूषणामुळे वाढणारे आरोग्यविषयक धोके पुण्यात वाढते वायू प्रदूषण, धूळ, कचरा जाळणे आणि प्रदूषित वातावरणामुळे दमा, ब्रॉन्कायटिस, ॲलर्जी, सायनसचे विकार, सततचा खोकला, श्वास घेण्यास त्रास, न्यूमोनिया आणि इतर श्वसनविकारांमध्ये वाढ होत आहे.

तसेच हृदयविकार, उच्च रक्तदाब, डोळ्यांची जळजळ, त्वचारोग, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे आणि मानसिक ताण यांचाही धोका वाढत आहे.

याशिवाय बिडी , गुटखा , सिग-रेट, पानमसाला आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन प्रदूषणाच्या परिणामांना अधिक घातक बनवून फुफ्फुसांचे आजार, तोंडाचा कर्करोग, फुफ्फुसांचा कर्करोग आणि हृदयविकारांचा धोका वाढवत आहे. वाहनांचा धूर, बांधकामातील धूळ, औद्योगिक उत्सर्जन आणि कचरा जाळणे यामुळे वाढते वायू प्रदूषण. प्रक्रिया न केलेले सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जात आहे. प्लास्टिक, फॉइल, कार्डबोर्ड आणि इतर कचऱ्याचे वाढते प्रमाण. उघड्यावर कचरा जाळल्याने विषारी धूर निवासी भागात पसरत आहे.

पुणे महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासमोर प्रमुख मागण्या

उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कठोर कारवाई.

, रिअल-टाइम हवेच्या गुणवत्तेची यंत्रणा बसवणे.

, प्लास्टिक व इतर कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट रोखणे.

, बांधकाम ठिकाणी धूळ नियंत्रण उपाय सक्तीने लागू करणे.

, नद्यांमध्ये जाणारे प्रक्रिया न केलेले सांडपाणी तात्काळ थांबवणे, हरितक्षेत्रांचे संरक्षण व मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण.

, प्रदूषण करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई., प्रदूषणाशी संबंधित आजारांवर विशेष आरोग्य तपासणी मोहीम राबविणे.

निसर्ग धोरणात्मक विलंबाची वाट पाहणार नाही उपक्रमाच्या शेवटी सचिन भोसले म्हणाले: प्रदूषित नद्या, विषारी हवा, प्लास्टिक कचरा आणि नष्ट होत चाललेली झाडे हे आजचे वास्तव आहे. आता त्याचे परिणाम नागरिकांच्या आरोग्यावरही दिसू लागले आहेत. प्रशासनाने घोषणांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे.

हा उपक्रम पुण्यातील प्रभावी, सर्जनशील आणि विचार करायला लावणाऱ्या पर्यावरण जनजागृती मोहिमांपैकी एक म्हणून नागरिकांकडून कौतुकास पात्र ठरत आहे.




# जेऊर कुंभारीतील श्री मारुती मंदिरात भाजप कार्यकर्त्यांकडून सामूहिक पूजा व महाआरती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जेऊर कुंभारी वार्ताहर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ देशाची सेवा करणारे पंतप्रधान म्हणून ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जेऊर कुंभारी येथील श्री मारुती मंदिरात भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने सामूहिक पूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून देशाच्या प्रगतीसाठी तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते, संचालक सतीश आव्हाड, माजी सभापती शिवाजी वक्ते, आरपीआय (आठवले) प्रदेश सचिव दिपकराव



गायकवाड, विजय रोहम, माजी संचालक मधुकर वक्ते, उपसरपंच जालिंदर चव्हाण, कोंडीराम वक्ते, अशोक राऊत, रमेश वक्ते, संजय शांतीलाल वक्ते यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना महर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर नवे स्थान निर्माण केले आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून, त्यांच्या निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी ही सामूहिक प्रार्थना करण्यात आली आहे. देश अधिक सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर व्हावा, हीच सर्वांची भावना आहे. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी राष्ट्रहित, सामाजिक एकात्मता आणि विकासाचा संदेश देत देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली.







# पिंपळगाव लेपला वीर बिरसा मुंडा बलिदान दिन साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी – येथील ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात मंगळवार दि.९ जुन रोजी वीर बिरसा मुंडा बलिदान दिन साजरा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.या बलिदान दिनानिमित्त गावातील ग्रामस्थांनी वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्प-हार हार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन केले.वीर बिरसा मुंडा बलिदान दिन हा दरवर्षी ९ जून रोजी संपूर्ण भारतात अत्यंत आदराने आणि उत्साहाने साजरा केला जातो.या अनुषंगाने पिंपळगाव लेप ग्रामपंचायतीच्या वतीने तसेच आदिवासी बांधवांनी एकत्र येत वीर बिरसा मुंडा यांचा बलिदान दिन मोठ्या उत्साहाने सादर केला.याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुक्यात उष्णतेच्या लाटेतही शेती खरीप पूर्व मशागतीला वेग, ४५ ते ४६ अंश तापमानात शेतकरी सकाळ-संध्याकाळ करताहेत पेरणीपूर्व मशागत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

चाळीसगाव तालुक्यासह परिसरात सध्या उष्ण-तेची तीव्र लाट कायम असून तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. अशा कडाक्याच्या उन्हातही,शेतकरी आगामी खरीप हंगामाच्या तयारीसाठी पेरणीपूर्व मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर करताना दिसून येत आहेत. मजुरांची कमतरता, वाढती उष्ण-ता आणि लग्नसराईचा हंगाम या तिहेरी संकटातही शेतकरी शेतीची कामे आटोपण्यासाठी झटत आहे. प्रशासनाकडून तापमानामुळे बाहेर पडू नका असा इशारा दिला असल्यावर सुध्दा जगाचा पोशिंदा शेतकरी राजा स्वतः च्या शरीराची काळजी न घेता, भर उन्हात काम करतांना दिसत आहे.त्याच बरोबर मजूर वर्गाचा ताफा बरोबर असतो.

सध्या शेतांमध्ये ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी, रोटाव्हेटर, पलटी नांगर, शेणखत पसरवणे, बांध साफसफाई, काटेरी झुडपे काढणे तसेच पाइपला-इन टाकण्याची कामे वेगाने सुरू आहेत. उष्णतेमुळे दिवसभर शेतात काम करणे कठीण होत,असल्याने अनेक शेतकरी सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी चार ते सात या वेळेतच कामे करत आहेत. काही शेतकरी मात्र रणरणत्या उन्हातही काम करताना दिसत आहेत. मजूर टंचाईमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली असून महिलावर्ग मोठ्या प्रमाणावर शेतात येत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी पावरी आदिवाशी महिला मजुराद्वारा शेतीची कामे केली जात आहेत.

ग्रामीण भागात लग्नसमारंभांची लगबग सुरू होती अनेक महिला कुरड्या, पापड, सांडगे, डाळी व धान्य वर्षाभरासाठी भरणे आदी घरगुती कामांमध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे शेतमजुरीसाठी महिला उपलब्ध होत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. महिला मजुरांना रोज ३०० रुपये तर पुरुष मजुरांना ५०० रुपये मजुरी देऊनही मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे ठाकले आहे. दरम्यान, उन्हाळी पिकांच्या काढणीची कामेही सध्या सुरू आहेत.

पिपंळगाव, रोहिणी करजगाव पिंपळवाड निकुंभ, तमगव्हाण, अंधारी, हिरापूर खडकी, सायगाव, पिलखोड, टाकळी, शिरसगाव,, तांबोळा, चित्तेगांव, गणेशपूर, पिंपरी बु!! ओढरे, पाटणा, मेहुणबारे, दहिवद, राजमाने, कळमडू, पोहरे, वाघळी, आदी परिसरात कपाशी, मका,भुईमूग उन्हाळी ज्वारी, बाजरी तसेच कांदा काढणीला वेग आला असून कांदा गोण्यांमध्ये भरण्याची कामेही सुरू आहेत. या उन्हाळी पिके घेण्यावर जोर आहेत. तर बागायती पिके घेतली जात आहेत तर खरीप पिके घेण्यासाठी शेतकरी वर्ग आपल्या कुटुंबासह शेतात काम करताना दिसून येत आहेत. पावरी समाजातील काही कुटुंबे सावलीत बसून भूईमुंगाच्या पाल्याच्या घोंगड्या तयार करतानाही आढळत आहेत.

खरीप हंगाम आता तोंडावर आला असून पे-रणीपूर्व मशागतीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. मात्र वाढते तापमान आणि मजुरांची कमतरता यामुळे शेतकऱ्यांची मोठी दमछाक होत आहे. आता पुढे शेती कशी करायची? असा प्रश्न अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत.

उष्णतेच्या लाटेमुळे शेतकरी वर्गासह मजूर वर्गालाही आरोग्याच्या समस्या जाणवत असून ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. शेतात मजुरांसाठी पाणी पोहचविणे कठिण होत आहे. ग्रामिण भागातील पाणी पुरवठा योजना कोणत्या तरी कारणाने बंद पडत असल्याने प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी दिवस-रात्र मेहनत घेत असला तरी नैसर्गिक परिस्थिती आणि मजूर टंचाईमुळे त्यांच्यासमोरील अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत.



**चाळीसगाव वार्तापत्र**
**यशवंतराव ताडगे सर**

आता जून महिना आला असून अद्यापही सूर्याची आग ओकताना सूर्य दिसत आहेत. एवढ्या कडक उन्हात शेतकरी व शेतमजूर खरीप पूर्व मशागत करीतआहेत.

आता शेतकऱ्यांना खरे पांढरे सोने म्हणून आ-ेळख असलेल्या कपाशीवरच यंदाही शेतकऱ्यांची मदार असतांना मका लागवडीत मात्र घट होवू शकते. २०२५ च्या खरीप हंगामात २१ हजार ८१० हेक्टर क्षेत्रावर मका लागवड झाली होती. ती यंदा २० हजार ७६० हेक्टर क्षेत्रावर लागवड अपेक्षीत आहे. म्हणजे जवळपास ९४० हेक्टर मका लागवड कमी होवू शकते. तर ज्वारी गतवर्षी ५४६ हेक्टरवर पेरा झाला होता तो यंदा वाढून ६३५ हेक्टर क्षेत्र अपेक्षीत आहे. बाजरी गतवर्षी २०३७हेक्टर क्षेत्रावर लागवड होती यंदा २३८० हेक्टरवर अपेक्षीत आहे. यंदा तूरची लागवड वाढणार आहे. गतवर्षी ५८३ हेक्टरवर तुर लागवड होती, यंदा ६५९५ हेक्टर, मूग गतवर्षी ५३७ हेक्टरवर पेरा होता यंदा ८८५ हेक्टर, उडीद गतवर्षी ४६२ हेक्टरवर पेरा होता यंदा

६२० हेक्टरवर पेरा होईल. सोयाबीन लागवड गतवर्षी १२९ हेक्टरवर होती यंदा तब्बल ८२५ हेक्टरवर पेरणी होणे अपेक्षीत आहे. भुईमुंगची लागवड गतवर्षी २५० हेक्टरवर लागवड झाली होती यंदा २६० हेक्टर लागवड होण्याची शक्यता आहे. तीळचे क्षेत्र गतवर्षी केवळ ५ हेक्टर क्षेत्रावर होते यंदा ते ५० हेक्टरवर जावू शकते.

कडधान्य पिकात मूग, उडीद, तूर, चवळी यांची सलग लागवड आणि आंतरपिक लागवड वाढण्याची शक्यता आहे. तर बाजरी आणि ज्वारी पिक लागवडीत घट होण्याची शक्यता आहे.

**३० हजार मेट्रीक टन खते लागणार**

गेल्या काही वर्षात रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर चाळीसगाव तालुक्याला यंदा सुमारे ३० हजार १०५ मेट्रीक टन रासायनिक खतांची गरज लागणार आहे. यात युरियाची ११ हजार ७०० मेट्रीक टन, पोटॅश २३६३ मेट्रीक टन, एसएसपी ४ हजार ७१३ मेट्रीक टन, आमो सल्फेट १७५ मेट्रीक टन, डीएपी १५३० मेट्रीक टन, १०.२६.२६ सुमारे ३६७५

मेट्रीक टन, १२.३२.१६ सुमारे ४२६ मेट्रीक टन, १४.३५.१४ सुमारे २७१ मेट्रीक टन, १५.१५.१५ सुमारे १८३५ मेट्रीक टन, १६.१६.१६ सुमारे ७८८ मेट्रीक टन, १९.१९.१९ सुमारे २४५ मेट्रीक टन, ८.२१.२१ सुमारे १५८ मेट्रीक टन, २०.२०.०.१३ सुमारे १६१९ मेट्रीक टन व २४.२४.० सुमारे ३०६ मेट्रीक टन इतकी मागणी यात संयुक्त खते १० हजार ९६१ मेट्रीक टन मागणी असून एकूण ३० हजार १०५ मेट्रीक टन रासायनिक खतांची खरीप २०२६ साठी गरज आहे

***एल निनोचे संकट असतांनाही चाळीसगाव तालुक्यात यंदाही पांढऱ्या सोन्यावरच शेतकऱ्यांची मदार***

**३ लाख कपाशीचे पाकीटे लागणार; खरीप हंगामाचीतयारी**

तालुक्यातील शेतकरी वर्गाने खरीप पीक पे-रणी साठी मे महिन्यात कडक ऊन पडत असेलेल्या ४०ते ४३अंश तापमानात शेतीची मशागत भर उन्हात करत आहेत. मे महिन्याच्या सूर्याचे ऊन असह्य करीत आहेत. सूर्य आग ओकत आहेत. तरी सुद्धा

पावसाने चाळीसगाव तालुक्यात मे महिन्यात जोरदार हजेरी लावली होती. तसेच जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पाऊस झाला होता. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी वेळेवर पेरणी उरकली होती. यंदा मात्र तापमान अक्षरशा भाजून काढत असून रब्बी हंगाम आटोपता घेत तालुक्यातील शेतकरी यावर्षीच्या खरीप हंगामासाठी सज्ज झाला आहे. सध्या शेतात पेरणीपूर्व मशागतीची कामे करताना दिसत आहेत. यंदा पावसावर एल निनोचे संकट असल्याचा इश-ारा देण्यात आहे. त्यामुळे कमी पावसाचा अंदाज व्यक्त होत आहे. असे असतांनाही पांढरे सोने अर्थात कापसाला शेवटच्या टप्प्यात नऊ हजारांपर्यंत भाव मिळाल्याने यंदाही तालुक्यात सर्वाधिक कापसाचाच पेरा राहील असा अंदाज व्यक्त होत आहे. सुमारे ९० हजार ५०० हेक्टरवर खरीपाची लागवड होते. त्यात एकट्या कापसाचा वाटा हा तालुक्यात यंदा २ लाख ९८ हजार ३०० कापूस बियाणे पाकीटे लागतील अशी माहीती तालुका कृषी कार्यालयाने दिली. यंदा सोयाबीन, उडीद व मूग लागवड मोठ्या प्रमाणावर वाढण्याचा अंदाज आहे.

**पांढऱ्या सोन्याकडेच कल**

चाळीसगाव तालुक्याचे एकूण क्षेत्रापैकी सुमारे ९० हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी होते. गेल्या काही वर्षांपासून

तालुक्यात शेतकऱ्यांकडून

हजार २५२ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड झाली होती व बीजे-रची ३ लाख ११ हजार ६२ व नॉन बीटीची २१९३ अशी ३ लाख १३ हजार २५५ कपाशी बियाणे आहे. नैसर्गिक आपत्ती आणि भाव कमी असल्याने अडचणीत असूनही शेतक-यांचा कापसावरच भर आहे. गत २०२५ मध्ये तालुक्यात ५९ पाकीटांची मागणी करण्यात आली होती. यंदा कपाशी पेरणी ५९ हजार ६६० हेक्टर क्षेत्रात बागायत व जिरायत कपाशीची लागवड होण्याची शक्यता आहे. त्यासाठी बीजे रची २ लाख ९६ हजार २१२ व नॉन बीटीवी २०८८ अशी २ लाख ९८ हजार ३०० अशी कापूस बियाणे पाकीटे लागणार आहेत. यावर्षी कापूस बागायत ३१ हजार ५०० हेक्टर तर जिरायत २९ हजार हेक्टर क्षेत्रात लागवड अपेक्षीत आहे. मागील वर्षापेक्षा यंदा कापसाचा पेरा वाढणार आहे.

**एल निनोचे संकट**

गतवर्षी चांगला

पाऊस झाला असला तरी शेवटच्या टप्प्यात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले. त्याची भरपाई शेतकऱ्यांनी रब्बीत काढण्याचा प्रयत्न केला. यंदा कापसाला मार्च एप्रिलपर्यंत सात साडे सात हजाराच्या आसपासच दर राहीला. मात्र में मध्ये कापसाच्या दरात एकदम उसळी घेऊन तो ९ हजारांवर गेला. हा कल पुढेही राहण्याची

**पेरणीची घाई न करण्याचे आवाहन**

कृषी विभागाकडून खरीप हंगामातील मोहिमेचे नियोजन केले जात आहे. आवश्यक खते व बियाणे यांचे नियोजन केले आहे. यंदा तीव्र उन्हाळ्याची स्थिती पाहता शेतकऱ्यांनी १०० मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आव-ाहन तालुका कृषी अधिकारी चाळीसगाव यांनी केले आहे.

शक्यता व्यक्त होत असल्याने शेतकऱ्यांची पुन्हा कापसावरच मदार असणार आहे. मात्र मात्र अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी सांगितला आहे. या पार्श्वभूमीवर कडधान्याचा पेरा वाढू शकतो असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

**मक्याचे क्षेत्र घटणार**

यावर्ष सुरुवातीपासून चांगला पाऊस होईल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. मात्र हवामान खात्याने एल निनोचा अंदाज वर्तविला असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शेतक-यांनी भर उन्हात पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना सुरुवात केली आहे. मागील वर्षी मान्सूनचे वेळेवर आगमन झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी वेळेत पेरणी उरकली होती. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार मागील वर्षी जून अखेरपर्यंत तालुक्यात ७० टक्क्यांपेक्षा जास्त पेरणी झाली होती. मात्र यावर्षी एल निनोच्या प्रभावाची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

****

# इंदापूर रेल्वे स्थानकात हिवताप जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

बोरघर / माणगांव - प्रतिनिधी: विश्वास गायकवाड मंगळवार दिनांक ९/६/२०२६ रोजी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय रायगड यांच्या पत्रानुसार Anti Malaria Month - June २०२६ कॅलेंडर अँक्टिव्हिटी अंतर्गत इंदापूर रेल्वे स्थानकावर जनजागृती मोहीम राबवण्यात आली.





उपस्थित अधिकारी - प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर अंतर्गत: - श्री. पांडुरंग शिव-ाजी तोंडे, आरोग्य सेवक, इंदापूर नंबर दोन, - श्री. सुधीर गणपत खैरे, आरोग्य सेवक, रातवड

दोघांनी प्रवाशांना व स्थानकावरील लोकांना थेट आरोग्य शिक्षण दिले. हिवतापबद्दल दिलेली माहिति १. कारण: फक्त अनाफिलीस जातीच्या डासांच्या मादीच्या चावण्याने हिवताप होतो. ही मादी स्वच्छ साचलेल्या पाण्यात अंडी घालते. २. डास जीवनचक्र: अंडी फ आळी फ कोष फ पूर्ण डास. पाणी साठल्यास ७-१० दिवसात डास तयार होतो. ३. लक्षणे: थंडी वाजून ताप येणे, डोकेदुखी, सांधेदुखी, अंगदुखी. कधीकधी ताप अनियमित असतो. येता कण कण तापाची, करा तपासणी रक्ताची असा सल्ला दिला.

प्रतिबंधाचे उपाय सांगितले
- रात्री झोपताना मच्छरदाणीचा वापर करा
- घरातील व परिसरातील पाणी साठे: रांजण, हौद, पिंप, टाक्या, डबे, बाटल्या, नारळाच्या करवंट्या, फुलदाण्या, कुंड्या इ. झाकून ठेवा
- आठवड्यातून १ दिवस कोरडा दिवस पाळा: भांडी पुसून कोरडी करूनच पुन्हा पाणी भरा - गप्पी मासे पाळा, ते आळी खात - गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा
- परिसर स्वच्छ ठेवा, कचरा साचू देऊ नका
- आरोग्य विभागाच्या फवारणी कार्यक्रमात सहभागी व्हा व सहकार्य करा

महत्वाचा सल्ला - कोणताही ताप हिवताप असू शकतो. त्यामुळे ताप आल्यास अंगावर न काढता प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथे जाऊन रक्ततपासणी करून घ्या व तज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार करा.

लोकांनी या मोहिमेला चांगला प्रतिसाद दिला व लोकसहभाग वाढवण्याचे आवाहन करण्यात आले.

